# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

<u>प्रसिद्धी पत्रक ता. ३१ जानेवारी २०१९</u>

# मनपाच्या २० कर्मचा-यांना सेवानिवृत्ती निरोप

**नागपूर, ता. ३१ :** नागपूर महानगरपालिकेचे पदवीधर आयुर्वेदीक वैद्य डॉ.डी.पी. खोब्रागडे यांच्यासह २० कर्मचाऱ्यांना गुरूवारी (ता. ३१) सेवानिवृत्ती निरोप देण्यात आला. महानगरपालिका मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृहामध्ये आयोजित निरोप समारंभाला यावेळी सहायक अधीक्षक (साप्रवि) मनोज कर्णिक, नितीन साकोरे, दत्तात्रय डहाके, डोमाजी भडंग, मनपा राष्ट्रीय युनियनचे अध्यक्ष सुरेंद्र टिंगणे आदी उपस्थित होते.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते पदवीधर आयुर्वेदीक वैद्य डॉ.डी.पी. खोब्रागडे यांच्यासह सर्व निवृत्त अधिकारी कर्मचाऱ्यांचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, तुळशीचे रोप आणि धनादेश देऊन गौरव

करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन सहायक जनसंपर्क अधिकारी प्रदीप खर्डेनवीस यांनी केले.

निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांमध्ये पदवीधर आयुर्वेदीक वैद्य डॉ.डी.पी. खोब्रागडे, कनिष्ठ निरीक्षक आर.व्ही. मेश्राम, कनिष्ठ लिपीक बी.के. डोंगरे, मजदूर राधेश्याम ठाकुर, मजदूर श्रावण मडावी, चौकीदार कम चपराशी रत्नाकर वाहने, रेजा अल्का मुंडे, चपराशी सुधाकर सुर्यवंशी, मजदूर निलकंठ गणवीर, चौकीदार कम चपराशी इंदु रामटेके, सहायक शिक्षिका कुरेशी खातून अब्दुल खान, उच्च श्रेणी शिक्षिका मंगला भुरे, उच्च श्रेणी शिक्षिका किरण धुमाळ, सफाई कामगार यशवंत बोरकर, अर्जुन समुंद्रे, पुरण समुंद्रे, बाबा पाटील, जानकी गोराडे, चंद्रकला रक्षेल यांचा समावेश आहे.